# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforesg.gov.in


पत्र

विषयः- उरण चाकण शिक्रापुर एलपीजी पाईपलाईन टाकणेसाठी वनक्षेत्र मागणी प्रस्ताव. क्षेत्र 1.04 हेक्टर.

जावक क्र. ब/20/जमिन/ 4074 /2015-16.
अलिबाग – 402 201, दिनांकः- 21-12-2015

प्रति,

वरीष्ठ व्यवस्थापक (एलपीजी प्रोजेक्ट),
एच.पी.सी.एल., हिंदुस्थान भवन-3,
शुरजी वल्लभदास मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-400 001

संदर्भः- आपलेकडील पत्र क्र. पीआरओजे/एमके दि. 2/12/2015.

आपण वरील संदर्भीय पत्रान्वये उरण चाकण शिक्रापुर एलपीजी पाईपलाईन अंतर्गत मौजे दिघाटी, ता. उरण येथील वनक्षेत्र 1.04 हेक्टर चा प्रस्ताव दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. 1 ते 57 चेकलिस्ट परिपूर्ण भरण्यांत आलेली नाही.
2. प्रस्तावामध्ये खुपशा ठिकाणी पान क्रमांक टाकण्यांत आलेले नाहीत ते परिपूर्ण असणे आवश्यक आहे.
3. प्रस्तावावर स्वाक्षरी करणेसाठी श्री. बी. शेषाचारी यांना प्राधिकृत केलेबाबत पत्र नाही.
4. प्रस्तावांत अंतर्भूत होणारे वनक्षेत्राबाबत वनहक्क कायदा-2006 अंतर्गत जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.
5. प्रस्तावांत 3 आखणी मार्गाबाबत प्रमाणपत्र समाविष्ठ करणे आवश्यक आहे.
6. कर्नाळा पक्षी अभयारण्यापासून प्रस्तावीत क्षेत्र हे 10 कि.मी. चे आत आहे, तथापी निच्छित किती क्षेत्रावर प्रस्तावीत क्षेत्र आहे हे नमूद करणे आवश्यक आहे, व त्याप्रमाणे नकाशामध्ये दर्शविणे आवश्यक आहे.
7. क्षेत्रविवरण तक्त्यांत दर्शविणेत आलेल्या चतुःसिमा या इकडील अभिलेखाशी जुळत नाहीत तरी त्याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.
8. क्षेत्र विवरण तक्त्यांत दर्शविणेत आलेले क्षेत्राचे जुने सर्व्हे नंबर कोणते याबाबत

तपशिल उपलब्ध करुन दिलेला नाही, तो देणे आवश्यक आहे. जेणेकरुन वनक्षेत्राबाबत खात्री करुन समाविष्ठ होणारे वनक्षेत्राची निच्छिती करणे शक्य होईल.

9. प्रस्तावांत समाविष्ठ असलेले इंडेक्स मॅप व लोकेशन मॅप यावरील पाईपलाईनचा आखणी मार्ग जुळत नाही, त्याबाबत खात्री होऊन अचुक आखणी मार्ग नकाशांवर दर्शविणे आवश्यक आहे.

10. पाईपलाईनचे आखणी मार्गात मौजे दिघाटी येथील दळी क्षेत्र येत असलेबाबत दिसून येत आहे, त्याअनुषंगाने संबंधीत दळी धारकांचे नाहरकत प्रमाणपत्र समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

सोबत संदर्भीय पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेला प्रस्तावाचा संच परत करण्यांत येत आहे. तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयात फेर दाखल करणेस विनंती आहे.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

D:\LAND 3\2015-16\FCAct\Wadkhal to Alibag New NH-116A\Wadkhal to Alibag 0.000 to 22.200.doc